# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १८३-२३** **दिनांक ०८/०६/२०२३**

## लाखो रुपये किंमतीचा गहाळ झालेला मुद्देमाल व रोख रक्कम अवघ्या ०२ तासांत शोधुन देण्यास नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी माहिला नामे संगीता हैतुम सिंग रा. रुम नं १०५, ए विंग, महालक्ष्मी दर्शन, स्टारसिटी, नायगाव पुर्व हया दिनांक ०६/०६/२०२३ रोजी मरीन्स लाईन्स, मुंबई ते राहते घर असे टक्सीने प्रवास करीत असताना प्रवासादरम्यान खबर देणार यांची बॅग कोठेतरी पडुन त्यातील सोन्याचे ०८ तोळे दागिने व ५०,०००/-रुपये रोख रक्कम गहाळ झाल्याबाबत कळविल्याने नायगाव पोलीस ठाणेत गहाळ मालमत्ता नोंद क्रमांक १५८/२०२३ अन्वये दाखल करण्यात आले.

सदर गहाळ मालमत्तामध्ये सोन्याचे ०८ तोळे दागिने व ५० हजार रुपये रोख रक्कम किमंतीचा मुद्देमाल असल्याने सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेवुन नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे यांच्या आदेशाने नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या दोन वेगवेगळे पथके तयार करण्यात आली. सदर खबर देणार यांचे राहते घर ते फाऊटंन हॉटेल असे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे खबर देणार यांचे ०८ तोळे सोन्याचे दागिने व ५०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ०४,५५,०००/- रुपये किंमतीचा मुद्‌देमाल वर नमुद खबर देणार यांच्याकडे खात्री करुन ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले- श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्रीमती पद्‌मजा बडे सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, देवरे, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, चेतन ठाकरे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, अशोक पाटील यांनी केली आहे.





----oooo----